**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण**
**जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर**
स्वराज्य भवन, नागाळा पार्क, कोल्हापूर - ४१६००२
दुरध्वनी क्रमांक : 0231-2659232 टोल फ्री (1077)
Email: rainkolhapur@gmail.com


सत्यमेव जयते

जा.क्र. नैआ/कोरोना विषाणू/854/2020,  दिनांक :29/03/2020

**वाचले**

1. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, 1897.
2. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005,
3. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील क्रमांक करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य-5, दिनांक 13/03/2020, 14/03/2020 तसेच 15/03/2020 रोजीच्या अधिसुचना.
4. फौजदारी प्रकिया संहिता, 1973 चे कलम 144 (1) (3)
5. महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना No.DMU/2020/CR.92/DisM-1, दिनांक 23 व 24 मार्च 2020.
6. गृह मंत्रालय, भारत सरकार यांचेकडील आदेश क्र. 40-3/2020-डी, दिनांक 24/03/2020.
7. इकडील जा.क्र. आधोव्यनिक/कोरोना विषाणू/30/2020, दिनांक 13/03/2020 रोजीचा आदेश.
8. इकडील क्र. कक्ष/कोरोना विषाणू/2020/आरआर-683 व 684, दिनांक 15/03/2020 रोजीचा आदेश.
9. इकडील जा.क्र. नैआ/कोरोना विषाणू/736/2020, दिनांक 22/03/2020 रोजीचा आदेश.
10. इकडील जा.क्र. नैआ/कोरोना विषाणू/789/2020, दिनांक 23/03/2020 रोजीचा आदेश.

---

विषय :- कोरोना विषाणु (कोवीड-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत.

## -: आदेश :-

ज्या अर्थी, आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील कलम 25 अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे व त्यातील पोट कलम 2 (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

ज्या अर्थी, राज्य शासनाने कोरोना विषाणुचा (कोव्हीड-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 दिनांक 13 मार्च 2020 पासुन लागु करुन खंड 2, 3, 4 मधील तरतुदींची अंमलबजावणीसाठी अधिसुचना निर्गमित केलेली आहे. त्याबाबतची नियमावली संदर्भिय 3 अन्वये प्रसिध्द केली आहे आणि जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी घोषित केलेले आहे.

ज्या अर्थी, कोविड-19 विषाणुच्या साथ संसर्गाचा प्रादुर्भाव झपाटयाने वाढत असल्याने आपत्कालीन उपाय योजनेचा भाग म्हणुन संदर्भिय 5 अन्वये मा. गृह सचिव आणि अध्यक्ष राष्ट्रीय कार्यकारी समिती भारत सरकार, यांनी आपत्ती व्यवस्थापन कायदा, कलम 10(2) अन्वये संपुर्ण देशभरात मार्गदर्शक सुचना, आदेश लागु केलेले आहेत. या पार्श्वभुमीवर ज्या विभागांकडे अत्यावश्यक व मुलभुत सेवा आहेत त्या विभागांना त्या सेवा संचालनामध्ये अडचणी निर्माण होत आहेत असे संबधित विभागांनी कळविले आहे.

त्या अर्थी, 4 आणि 5 अन्वये मला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन **मी दौलत देसाई जिल्हाधिकारी, कोल्हापूर** या अन्वये खालील निर्देश देत आहे.

Scanned by CamScanner

1. जिल्हयातील राष्ट्रीय महामार्ग आणि राज्य महामार्गाची कामे दुरुस्ती करणे
2. महावितरण, महापारेषण, महानिर्मिती आणि इतर विदयुत विषयक विभागाकडील इलेक्ट्रिक पोल टाकणे व इलेक्ट्रिक मेंटनन्स्, दुरुस्ती ई.
3. भारत संचार निगम लिमिटेड आणि इतर दुरसंचार कंपनी कडील दुरसंचार आणि इंटरनेट सेवा संचालन लाईन मेंटनन्स ई. खाजगी क्षेत्रातील संस्थाना bsnl चे जिल्हास्तरावरील अधिकारी आणि लेखी आदेश द्यावेत.
4. पाणी पुरवठा आणि जलनिस्सारण आणि स्वच्छता इत्यादी अनुषंगिक कामे.

सद्यस्थितीतील आपत्कालीन परिस्थिती लक्षात घेता तात्काळ पुर्ण होणे गरजेचे आहे. सबब ती कामे तात्काळ पुर्ण करून घेण्यात यावीत. जेणेकरुन अत्यावश्यक सेवा कोलमडणार नाही तसेच संबधित विभागाचे जिल्हा प्रमुख अधिकारी यांना असेही निर्देश देणेत येत आहेत कि त्यांनी उपरोक्त नमुद अत्यावश्यक सेवेसाठी नमुद अधिकारी, कर्मचारी आणि वाहने या कामी नेमणुक करुन त्या प्रमाणे आदेश आपलेस्तरावर काढावेत. सदर आदेशाची प्रत पोलीस विभागाकडे द्यावी आणि सर्व नियुक्त अधिकारी कर्मचारी यांना सोबत आदेश प्रत आणि कार्यालयाचे ओळखपत्र सोबत बाळगण्यासाठी सुचना द्याव्यात. त्याच प्रमाणे संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेने सर्व कामगारांच्या आरोग्य सुविधेची स्व:त जबाबदारी घ्यावी.

तसेच उपरोक्त् विभाग /संस्था यांनी कोविड-19 या विषाणु संसर्ग प्रतिबंधात्मक उपाय योजनेबाबत आवश्यक ती काळजी घ्यावी. तसेच SOCIAL DISTANCE चे नियम पाळावेत आणि आरोग्य विभागाने वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे पालन करणे बंधनकारक राहील. सदर आदेशास तात्काळ अंमल देण्यात यावा.

तसेच आदेशाचा भंग करणा-या कोणत्याही व्यक्ती,संस्था, आणि संघटना विरुध्द आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 साथरोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 आणि या संदर्भातील शासनाचे प्रचलित इतर अधिनियम व नियम या अन्वये योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी.

(दौलत देसाई)
जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण
कोल्हापूर

प्रति :- 1. मा. पोलीस अधीक्षक कोल्हापूर यांना माहितीसाठी.
2. उपविभागीय दंडाधिकारी /तहसिलदार सर्व, जिल्हा कोल्हापूर यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
3. सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालये विभागप्रमुख------------------- जिल्हा कोल्हापूर यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
4. जिल्हा माहिती अधिकारी,कोल्हापूर यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

प्रत- 1. मा विभागीय आयुक्त, पुणे विभाग पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर
2. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय मुंबई-32 यांना माहितीस्तव सविनय सादर

Scanned by CamScanner